विधान परिषदेच्या १७ जागांसाठी रणधुमाळी

स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात अडीच वर्षांपासून जागा रिक्त

विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या – ७८

निवडले जाणारे सदस्य –	२२
सध्या रिक्त जागा –	१७
निवडणूकीसाठी आवश्यक मतदारसंख्या अट – ७५ टक्के	

निवडणूक होणारे मतदारसंघ | अहिल्यानगर, सोलापूर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, परभणी-हिंगोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, संभाजीनगर-जालना, नागपूर.

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आता विधान परिषदेतील रिक्त जागांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वी विधान परिषदेतील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ रिक्त जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून प्रमुख पक्षांनी तयारी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यामुळे अनेक मतदारसंघांतील विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. परिणामी, गेल्या अडीच वर्षांपासून या जागा रिक्त राहिल्या होत्या. मात्र अलीकडेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्याने आता निवडणुकीसाठी आवश्यक अट पूर्ण झाली आहे. नियमानुसार, एखाद्या मतदारसंघात एकूण मतदारसंख्येच्या किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणे आवश्यक असते.

पावसाळी अधिवेशनापूर्वी निवडणूक : विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ असून त्यापैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतून निवडून येतात. सध्या त्यातील १७ जागा रिक्त आहेत. या निवडणुकांचा थेट परिणाम विधान परिषदेतील सत्तासमीकरणांवर होणार असल्याने महायुती आणि महाविकास आघाडीचे लक्ष या निवडणुकांकडे लागले आहे. आगामी पावसाळी अधिवेशनापूर्वी या निवडणुका पार पडल्यास विधान परिषदेतील राजकीय चित्र बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

५४५९ पोलिसांच्या घरांसाठी १७६८ कोटी मंजूर

देवेंद्र फडणवीसांचा यांचा मोठा निर्णय

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** महाराष्ट्रातील शेकडो पोलिसांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना आता हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांच्या घरासाठी तब्बल १७६८ कोटी रूपये मंजूर केले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात 'एक्स' या सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती जाहीर केली. पोलिसांच्या कल्याणासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. जनतेच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत आपल्या पोलिसांना घरे मिळाली पाहिजे, यासाठी प्रारंभीपासून मी आग्रही राहिलो आहे. त्यामुळेच २०१४ ते २०१९ या काळात मोठ्या संख्येने पोलिसांना घरांसाठी व्याजसवलत अनुदान योजना राबविण्यात आली. महाविकास आ घा डी च या काळात ती योजना बंद केली गेली होती. नंतर पुन्हा आम्ही ती योजना सुरु केली. आज मला सांगताना आनंद होतो की, आमच्या ५४५९ पोलिसांना घरांसाठी घरबांधणी अग्रीम म्हणून १७६८.०८ कोटी रुपयांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे आलेल्या या प्रस्तावांसाठी ही रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांची आग्रही भूमिका

देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयाचा फायदा राज्यातील ५४५९ पोलिसांना होणार आहे. या सर्व पोलिसांना हक्काचे घर मिळावे, त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. फडणवीस यांनी आज घोषणा करताना,५४५९ पोलिसांना घरांसाठी १७६८.०८ कोटी रुपयांच्या घरबांधणी अग्रीम निधीला मंजुरी दिल्याची माहिती दिली. महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे आलेल्या या प्रस्तावांसाठी ही रक्कम मंजूर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत पोलिसांना घर खरेदी किंवा बांधकामासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे.

काँग्रेस नेत्याच्या वाहनाला अपघात

पुणे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभय छाजेड यांच्या वाहनाला मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास पुण्याच्या परिंगुट परिसरात अपघात झाला. या घटनेत ते गंभीर जखमी झाले आहेत. छाजेड हे आपल्या कामानिमित्त कारने पुण्याच्या दिशेने येत असताना त्यांच्या कारवरचा ताबा सुटला आणि वाहन थेट बाजूला असलेल्या टेकडीवर जाऊन आदळले.धडकेनंतर कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अपघातात छाजेड आणि त्यांचे चालक दोघेही गंभीररीत्या जखमी झाले आहेत.

रोहिणी खडसे यांची सरकारवर घणाघाती टीका

शेतकरी आत्महत्यांवर कवितेतून प्रहार

▶ **मुंबई.** एनसीआरबीच्या अहवालानुसार देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात झाल्याचा मुद्दा पुढे करीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका कवितेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले. "अभिनंदन साहेब, तुम्ही हे करून दाखवले, माझ्या माता भगिनींच्या कपाळाचे कुंकू पुसून दाखवले.." अशा ओळींनी सुरू होणाऱ्या या कवितेत त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीची बिकट अवस्था आणि जमिनींच्या संपादनाच्या मुद्द्यावरून सरकारवर टीका केली आहे. शेतकऱ्यांच्या घामाला आधी मातीमोल केलं, अन त्यांच्या आत्महत्येच्या शर्यतीत तुम्ही नंबर 'एक'च बक्षीस पटकावलं, असे म्हणत त्यांनी राज्यातील परिस्थितीवर संताप व्यक्त केला.

शेतकरी, महागाईवर लढा तीव्र करणार

बैठकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा निर्धार

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईतील सिल्व्हर ओक येथे पार पडली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सोशल मीडियावर याबाबत माहिती देत महाराष्ट्रातील शेतकरी, महागाई आणि जनतेच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले.

शशिकांत शिंदे यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, राज्यातील शेतकऱ्यांना अतीवृष्टी, हमीभाव जाहीर न होणे आणि विविध नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागत असताना सरकारची भूमिका केवळ "बघू आणि विचार करू" अशी असल्याचा आरोप करण्यात आला. वाढती महागाई, घरगुती वापराच्या वस्तूंच्या किंमतीत झालेली वाढ आणि त्यावर सरकारची अस्पष्ट भूमिका यामुळे सामान्य जनता त्रस्त असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीत महाराष्ट्राच्या हितासाठी तयार करण्यात आलेल्या विविध आ रा ख ड्य ां चा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच आगामी काळात पक्षाची भूमिका, संघटनात्मक बांधणी आणि जनहिताच्या मुद्द्यांवर आक्रमकपणे लढा उभारण्याबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. यावेळी माजी केंद्रीय कृषी मंत्री म्हणून शरद पवार यांनी देशात घडवून आणलेल्या फलक्रांतीचा उल्लेख करत त्यांच्या मार्गदर्शनाला विशेष महत्त्व असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. पक्षाच्या भविष्यातील वाटचालीचा संकल्प अधिक दृढ करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीला सुप्रिया सुळे , धैर्यशील मोहिते पाटील, जयंत पाटील , जितेंद्र आव्हाड , हर्षवर्धन पाटील आणि राजेश टोपे यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते.

मान्यता ● राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

पंढरपूर, सातारात माजी सैनिक केंद्र

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येथे वारी आणि दर्शनासाठी येणाऱ्या माजी सैनिकांच्या सोयीसाठी त्याचप्रमाणे सातारा येथेही एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी व्यवहार्यता पडताळून प्रस्ताव पाठविण्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मान्यता दिली. माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची वार्षिक बैठक आज राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन येथे झाली. या बैठकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली. पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल डी. एस. कुशवाहा, रिअर एडमिरल शंतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल हे माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे. पुनर्स्थापना उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ देणे, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे, निधीच्या योग्य व पारदर्शक वापरावर देखरेख ठेवणे या उद्देशाने ही समिती कार्य करते.

माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार मिळावा

या बैठकीत लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिकांसाठी विश्रामगृहे, महासैनिक हॉल व लॉन्स तसेच पुणे येथील सैनिक कल्याण संचालनालयातील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच किमान वेतन कायद्यानुसार करण्यात आलेल्या वेतन पुनर्निर्धारणालाही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील तसेच धुळे येथील मिलिटरी बॉईज हॉस्टेलचे माजी सैनिक विश्रामगृहात रूपांतर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिक विश्रामगृहे तसेच महासैनिक हॉल व लॉन्स येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. या निर्णयामुळे ऊर्जा बचतीसह पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळणार आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी समितीमार्फत व्यावसायिक स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्याचे निर्देश देऊन या उपक्रमांमध्ये माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा अशी सूचना केली. मंत्री शंभुराज देसाई यांनी सातारा येथे माजी सैनिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे सांगितले. या प्रस्तावास राज्यपालांनी सहमती दर्शवून पंढरपूरसह सातारा येथील केंद्रासाठी आर्थिक आणि अनुषंगिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाई करा

परिवहन मंत्री सरनाईक यांचे निर्देश

▶ **मुंबई , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** रा ज या त बे का य दे शी र टॅक्सी रिक्षा ॲप जोरात सुरू आहेत. एका ॲपवर हे चालक लाखोचा धंदा करीत असून प्रवाशांची फसवणूक करत आहेत. राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अशा अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र सायबर विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना पत्र पाठवले आहे. तसेच परिवहन आयुक्तांनी देखील अशा आशयाचे पत्र सायबर क्राईम विभागाला दिले आहे.सरनाईक यांनी पत्रात म्हटले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

Short News

भोंदू महेश गिरीचा जामीन फेटाळला

नाशिक. लैंगिक शोषण प्रकरणातील भोंदू महेश गिरीचा जामीन निफाड जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे .धारणगाव खडकचा महेश गिरी उर्फ महेश काकडे यांनी स्वत :ला महाराज म्हणवत महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. जादूटोण्याच्या नावाखाली त्यांच्यावर लासलगाव पोलिस ठाण्यांत फसवणुकीचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजी खासदार गंगाधर कुचन यांचे निधन

सोलापूर. सोलापूरचे माजी खासदार गंगाधरपंत सिद्रामप्पा कुचन (९१) याचे आज पहाटे पाच वाजता अश्विनी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे पार्थिव अश्विनी सहकारी रुग्णालयास देहदान करण्यात आले आहे.

स्पा सेंटर चालविण्यासाठी मागितली ३६ हजारांची लाच

पोलिस अंमलदार एसीबीच्या जाळ्यात

▶ **कळंब , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** स्पा सेंटरचा व्यवसाय सुरळीत चालू ठेवण्यासाठी मासिक हप्त्याच्या स्वरूपात लाचेची मागणी करणाऱ्या कळंब पोलीस ठाण्यातील एका पोलिस अंमलदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

ही कारवाई सोमवारी कळंब शहरात करण्यात आली. या प्रकरणी अशोक दादाराव करवर पोलिस अंमलदार यांना ताब्यात घेण्यात आले असून दुसरे पोलीस अंमलदार सिद्धेश्वर प्रकाश शिंदे(३७) यांचा शोध सुरू आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचा कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय आहे. हा व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्यासाठी पोलिस निरीक्षकांसाठी २० हजार रुपये व दुय्यम अधिकाऱ्यांसाठी २० हजार रुपये, असे एकूण ४० हजार रुपयांच्या हप्त्याची मागणी संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत होती. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटल्यास स्पा सेंटर बंद करून कारवाई केली जाईल, अशी धमकीही देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. त्यावेळी ३६ हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे कबूल केले. त्यानंतर ११ मे रोजी सापळा रचण्यात आला. तक्रारदाराकडून ३६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अशोक करवर यांना स्विफ्ट कारमध्ये रंगेहाथ पकडण्यात आले.

शिंदेंच्या नगरसेवकाचा भाजप नेत्याला चोप

ठाणे. बदलापुरात शिंदेसेनेच्या नगरसेवकांनी भाजप पदाधिकाऱ्याच्या मुलाला बेदम मारहाण केली आहे. सनी मारुती पाटील असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव असून याप्रकरणी युवा सेनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष नगरसेवक रोहन पाटील, शिवसेनेचे उपशहर प्रमुख सूरदास पाटील यांच्यासह दहा जणांवर बदलापूर पुर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सनी पाटील याचे वडील मारुती पाटील हे पालिका निवडणुकीत नगरसेवक रोहन पाटील यांच्या विरोधात भाजपाकडून निवडणुकीला उभे होते. तेव्हापासूनच त्यांच्यातला वाद विकोपाला गेला होता. आता एका हळदी समारंभाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने दोन्ही गट पुन्हा आमने-सामने आले. त्यावेळी नगरसेवक रोहन पाटील, सूरदास पाटील सहकाऱ्यांनी आपल्याला बेदम मारहाण केल्याचा आरोप सनी पाटील यांनी केला आहे.

अर्थव्यवस्थेसाठी ही धोक्याची घंटा

दमानिया यांचा केंद्रावर निशाणा

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारतीय रुपयाची घसरण होत १ डॉलरच्या तुलनेत रुपया ९५.५ वर गेल्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. रुपया ऐतिहासिक नीचांकावर पोहोचला आहे. ही आपल्या अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. आयात महाग होईल, पेट्रोल-डिझेलचे दर वाढतील आणि त्याचा थेट परिणाम महागाईवर होईल. सामान्य माणूस अधिक भरडला जाईल, असे दमानिया यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. त्यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमांवरही प्रश्न उपस्थित केले. सरकार कधी जागे होणार? राजकारण सोडून देशाचा विचार कधी करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या या ट्विटनंतर सोशल मीडियावर प्रतिक्रिया उमटत असून, आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि रुपयाच्या घसरणीवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, डॉलरच्या तुलनेत रुपयाची सतत होत असलेली घसरण ही आयात-आधारित क्षेत्रांसाठी चिंतेची बाब मानली जात आहे. विशेषतः इंधन, इलेक्ट्रॉनिक्स आणि औद्योगिक कच्च्या मालाच्या किमती वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मंडप गोदामाला आग, सिलेंडर स्फोटांनी हादरे

पुणे. अप्पर डेपोसमोर असलेल्या काळे मंडप यांच्या मंडप साहित्याच्या गोदामाला मंगळवारी दुपारी अकराच्या सुमारास आग लागली. आगीदरम्यान दोन सिलेंडर स्फोटांमुळे नागरिकांमध्ये झाले. स्फोटांचा आवाज दूरपर्यंत ऐकू गेल्याने अनेकांनी घराबाहेर धाव घेतली.गोदामामध्ये मंडप साहित्य आणि सिलेंडर साठवलेले असल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनली होती. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रसंगावधान राखत गोदामामध्ये प्रवेश केला आणि आणखी सात ते आठ सिलेंडर सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली असून परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. या आगीत एक टेम्पो आणि चार ते पाच दुचाकी जळून खाक झाल्या असून मंडप साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

नदीत बैलगाडी उलटली; शेतकऱ्यासह बैलांचा मृत्यू

▶ **जळगाव, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** गिरणा नदीच्या पात्रातून बैलगाडी घेऊन जात असताना, पाण्याचा आणि खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने बैलगाडी उलटली. या अपघातात वडनगरी येथील शेतकरी दिलीप रामभाऊ कल्याणकर यांचा दोन बैलांसह पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. वडनगरी येथील रहिवासी असलेले दिलीप कल्याणकर (५५) आणि त्यांचे सहकारी चिंतामण नाईक हे दोघे दररोजप्रमाणे सरपंच दत्तू रामचंद्र पाटील यांच्या खेडी भोकर शिवारातील शेतात मजुरीसाठी जात होते. मंगळवारी सकाळी ७:३० च्या सुमारास त्यांची बैलगाडी गिरणा नदीच्या पात्रातून जात होती. नदीपात्रात असलेल्या एका खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने बैलगाडी उलटली. बैलगाडी उलटताच प्रसंगावधान राखत चिंतामण नाईक यांनी पाण्यात उडी घेतली, ज्यामुळे त्यांचे प्राण वाचले. मात्र, दिलीप कल्याणकर यांना सावरण्याची संधी मिळाली नाही. ते गाडीसह खोल पाण्यात अडकल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला.

मराठीचा अभिमान पण गरिबांवर दादागिरी नको

मुंबई. मराठीचा आम्हाला अभिमान आहे. मराठी ही आमची मातृभाषा असून महाराष्ट्रात मराठीचा आग्रह जरूर धरला पाहिजे. मात्र मराठी बोलण्यासाठी रिक्षा-टॅक्सी चालकांसारख्या गरीबांवर दादागिरी करणे योग्य नाही,असे स्पष्ट मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले. बांद्रा येथील रंग शारदा ऑडिटोरीयम येथे भाजपप्रणीत वाहतूक संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना त्यांनी मराठी विरुद्ध हिंदी असा वाद निर्माण करणे चुकीचे असल्याचे सांगितले. जातीभेद, धर्मभेद, प्रांतभेद याप्रमाणेच भाषिक भेदभावही भारतीय राज्यघटनेच्या विरोधात आहे.

राज्यात दोन मृत्यूला आरोग्य विभागाचा दुजोरा

उष्माघाताचे २२९ रुग्ण,५ दगावले

▶ **पुणे , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यात वाढत्या तापमानामुळे दोन महिन्यांत उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. १ मार्च ते ७ मेदरम्यान राज्यभरात उष्माघाताचे एकूण २२९ रुग्ण आढळले असून, त्यांपैकी दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. याशिवाय आणखी तीन संशयित मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने वारंवार ४० ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. सर्वाधिक ७९ रुग्णांची नोंद छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झाली असून, त्यानंतर नंदुरबार जिल्ह्यात २९ रुग्ण आढळले आहेत. नाशिकमध्ये १९, अमरावतीत १२, बुलढाण्यात ११, गडचिरोलीत ८, अकोल्यात ७, तर अहिल्यानगर, रत्नागिरी, वर्धा आणि यवतमाळ येथे प्रत्येकी सहा रुग्ण नोंदवले गेले आहेत. लातूरमधील निलंगा तालुक्यातील ६० वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघातामुळे मृत्यू तसेच जळगाव जिल्ह्यातील ३४ वर्षीय फळविक्रेत्याचाही मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचे आरोग्य विभागाच्या आरोग्य विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

इर्शाळगडावर तरुणाचा उष्माघाताने मृत्यू

इर्शाळगडावर ट्रेकिंग संपवून खाली उतरत असताना उष्माघातामुळे एक युवक थेट मूर्छा येऊन कोसळला. रुग्णालयात दाखल केले खरे पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. रितेश कोणका असे या दुर्दैवी ट्रेकर्स युवकाचे नाव असून उष्माघातामुळे त्याचा मृत्यू झाला. तो डोंबिवलीच्या कोपर परिसरात राहत होता. डोंबिवलीतील साहिल सुर्वे, युगराज चव्हाण, मितेश गुप्ता, देवेश गुप्ता, क्रिश शेठी व रितेश कोणका या तरुणांचा ग्रुप इर्शाळगड येथे ट्रेकिंगसाठी गेला होता. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास परतीचा प्रवास करत असताना रितेश कोणका याला उन्हाचा प्रचंड त्रास झाला.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा - गणेशपेठ, नागपूर
हरीब मंडळ, गणेशपेठ, एस. टी. बस स्टँडजवळ, गणेशपेठ, नागपूर, 440018

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना "परिशिष्ट-IV-A [नियम 6 (2) आणि 8 (6) ची तरतूद पहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 6 (2) आणि 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल ॲसेटस ॲन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

अनु./ लॉट क्र.	कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार)	एकूण देय.	1. राखीव किंमत / 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) / 3. बिड वाढीव रक्कम	ई-लिलावाची तारीख : ई-लिलावाची वेळ : प्रारंभ	ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक/ वास्तविक)	मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ.	संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक
1	**श्री. प्रवीण विनायक तांडुलकर** पत्ता : फ्लॅट क्र. G-301, तिसरा मजला, टेकॉप्स गार्डन, उमरेड रोड, बहादुरा, दिघोरी, नागपूर - 440034 **श्रीमती ज्योती प्रवीण तांडुलकर** पत्ता : फ्लॅट क्र. G-301, तिसरा मजला, टेकॉप्स गार्डन, उमरेड रोड, बहादुरा, दिघोरी, नागपूर - 440034	रेसिडेन्शियल अपार्टमेंट क्र. G - 301 **वर्णन :** सर्व भागव तुकडा जमीन आणि ईमारत असलेला खसरा क्र. 6/1, 6/2, 6/3 व 6/4 असलेली एकूण क्षेत्रफळ (1.17 + 1.21 + 0.84 + 1.53) = 4.75 हेक्टर म्हणजेच 47,500 चौ. मी. इतकी जमीन, मौजा गोंही (सिम), पी.एच. क्र. 35, खाते क्र. 23 व 25, आर. एन. मंडळ पर्डी, ग्रामपंचायत बहादुरा, गोंही उमरेड रोड, नागपूर येथे स्थित असून नागपूर महानगरपालिका (NMC) व नागपूर सुधार प्रन्यास (NIT) यांच्या हद्दीत, तहसील नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर येथे असून तिच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :- पूर्वेस : खसरा क्र. 7, पश्चिमेस : नरसाळा रोड, उत्तरेस : खसरा क्र. 7/3, 7/5 व 7/6, दक्षिणेस : नरसाळा रोड, वरील अपार्टमेंट प्रकल्पामध्ये, "TECHOPS GARDEN" नावाच्या योजनेतील विंग - G मधील तिसऱ्या मजल्यावर असलेले निवासी अपार्टमेंट क्र. G-301, जे खसरा क्र. 6/1, 6/2, 6/3 व 6/4 वर बांधलेले आहे, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ 35.593 चौ. मीटर, बांधकाम क्षेत्रफळ 40.238 चौ. मीटर व सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ 65.71 चौ. मीटर आहे, तसेच एकूण 38474.293 चौ. मीटर प्लॉटेबल जमिनीमध्ये 0.110% अविभाज्य हक्क व हिस्सा यासह, मौजा गोंही (सिम), पी.एच. क्र. 35, तहसील नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर येथे स्थित असून त्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-पूर्वेस : अपार्टमेंट क्र. G-308, पश्चिमेस : कॉमन एरिया व खसरा क्र. 22/C, उत्तरेस : अपार्टमेंट क्र. G-302, दक्षिणेस : कॉमन एरिया व खसरा क्र. 22	रु. 15,74,551.00/- दिनांक 18.12.2025 रोजीपर्यंत + लागु न झालेले व्याज + कायदेशीर शुल्क + दंडात्मक व्याज + इतर शुल्क	रु. 20,05,200/- / रु. 2,00,520/- / रु. 25,000/-	19/06/2026 13:00 वाजता ते समाप्ती वेळ : 17:00 वाजेपर्यंत / **वेळ : बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :** 19.06.2026 रोजी सायं. 17:00 वाज